पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १६९**

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक – **१२/०५/२०१५** वेळ – **सकाळी ११.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक **१२/०५/२०१५** रोजी सकाळी **११.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**
२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
३) मा.गायकवाड संध्या सुरदास
४) मा.भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापु
५) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
६) मा.प्रसाद शेट्टी
७) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
८) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
९) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
१०) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
११) मा.अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील, मा.तुपे–सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे,मा.कडूसकर,मा.माने,मा.दंडवते, मा.फुंदे,मा.दुरगुडे,मा.खोसे-सहा.आयुक्त,मा.डॉ.साळवे-अति.वैद्यकीय अधिकारी, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.दुधेकर,मा.सवणे,मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण,मा.कपिले,मा.थोरात,मा.साळवी,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.खाबडे,मा.पिरजादे,मा.बरशेट्टी, मा.जुंधारे,मा.गलबले,मा.घोडे,मा.केदारी,मा.औंभासे,मा.गट्टूवार-कार्यकारी अभियंता, मा.इंदलकर-कामगार कल्याण अधिकारी, मा.बोदडे-प्र.अधिकारी, मा.शिंपी-नगररचनाकार, मा.गावडे-अग्निशामक अधिकारी, मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले -</u>**

विषय क्रमांक-३१) चिखली प्राधिकरण से.१८ प्लॉट क्र.२२ शिवतेजनगर उद्यानातील प्रकाश व्यवस्थेकरीता लघु दाब वीजपुरवठा घेणेकामी म.रा.वि.वि.कं.लि. यांस रक्कम रुपये ५४१९/- अदा करणेस मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक-३२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील विविध प्रकल्पांसाठी मे.व्हेक्टर डिझाइन्स यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत – मा.संध्या गायकवाड, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-३३) मनपाच्या विकास कामांची/प्रकल्पांची एरियल फोटोग्राफी, व्हिडीओग्राफी तसेच चित्रफित तयार करणेबाबत...

विषय क्रमांक-३४) महानगरपालिकेच्या विविध विभागांकडी मागणीनुसार उदा. महोत्सव, सत्कार समारंभ, अतिक्रमण कारवाई इ.ची व्हिडीओ शुटींग करणेबाबत...

विषय क्रमांक-३५) निलंबन कालावधीमधील वेतन व भत्ते अदा करणेबाबत – मा.विनायक गायकवाड, मा.प्रसाद शेट्टी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-३६) ट्रिंग ट्रिंग डे- सायकल दिवस या कार्यक्रमासाठी लोककला सादर केलेल्या लोककलाकारांना रक्कम अदा करणेबाबत – मा.संध्या गायकवाड, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-३७) क क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील मौजे सांगवी प्रभाग क्र.५९ मधुबन येथील विकास आराखड्यातील डी.पी. रस्ते विकसीत करणेसाठी सल्लागार नेमणुकीबाबत - – मा.संध्या गायकवाड, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-३८) मा.शिवशक्ती स्वयंरोजगार संस्थेस मुदतवाढ देणेबाबत – मा.संध्या गायकवाड, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-३९) भोसरी येथील विद्युत दाहिनी ठेकापद्धतीने खाजगी संस्थेस चालन देखभाल दुरुस्तीकरिता देणेबाबत...

--------

अ) दिनांक ५/०५/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१६८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) **मा.संध्या गायकवाड** – मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ११३८८ दिनांक २८/४/२०१५ मध्ये दिनांक २८/४/२०१५ नंतरचा “विभाग-पर्यावरण अभियांत्रिकी” हा मजकूर वगळणेत येवून कार्यपत्रिका क्रमांक १६७ दिनांक २८/४/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत यावा.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ११३८८ दिनांक २८/४/२०१५ मध्ये दिनांक २८/४/२०१५ नंतरचा “विभाग-पर्यावरण अभियांत्रिकी” हा मजकूर वगळणेत येवून व त्या दुरुस्तीसह कार्यपत्रिका क्रमांक १६७ दिनांक २८/४/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

--------

ठराव क्रमांक – ११४४२ विषय क्रमांक – १

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/३इ/कावि/४२७/१४ दि.२७/१/२०१५

विषय - प्र.क्र.७ च-होली व परिसरातील विविध ठिकाणचे मनपाच्या ताब्यात आलेले रस्ते खडीकरण व बीबीएमने विकसीत करणेबाबत...

विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४४३ विषय क्रमांक – २

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/३इ/कावि/४००/२०१५ दि.५/१/२०१५

विषय - प्र.क्र.७ च-होली येथील ताजणेमळा, काळजेवाडी कोतवालवाडी पठारे मळा व इतर ठिकाणचे अंतर्गत रस्ते खडीकरण व बीबीएम करणेबाबत...

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४४४ विषय क्रमांक – ३

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग–आरोग्य मुख्य कार्यालय

सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/४/कावि/२६२/१५ दि.३०/३/२०१५

विषय - प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या शाळा इमारतींची दैनंदिन साफसफाई करणे कामास मुदतवाढीबाबत...

विषय क्रमांक ३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४४५ विषय क्रमांक – ४

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – उद्यान/वृक्षसंवर्धन

सुचक –मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/१०४/१५ दि.९/४/२०१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.१२/२०१४-१५ अन्वये मो.जा.क्र. ३७/४१/४२ एस.ब्लॉक एम.आय.डी.सी. भोसरी येथील वृक्षलागवड रोपांची देखभाल करणे (निविदा नो.क्र.१२/२०१४-१५) कामी मे.अथर्व स्वयंरोजगार औद्य. सेवा सह सं.मर्या. (निविदा रक्कम रूपये ३,०४,४८०/- (अक्षरी र.रू.तीन लाख चार हजार चारशे ऐंशी फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय ही सर्वात कमी दराची निविदा (-२४.७५ **%)** स्विकृत करणेत आली असून त्यांचेशी करारनामा करून घेणेत आला आहे. प्रस्तुतकामी २ वर्ष कालावधीसाठी येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४४६ विषय क्रमांक – ५

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – ड क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.संपत पवार

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/१७६/२०१५ दि.१६/४/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/२०१४-१५ अन्वये, ड क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात औष्णीक धुरीकरण करणेकरीता रिक्षा टेम्पो भाड्याने घेणेकामी मे.श्री.जगन्नाथ महिला स्वयंरोजगार सेवा सह.संस्था (नि.र.रु.६,६९,६००/- (अक्षरी र.रू.सहा लाख एकोणसत्तर हजार सहाशे) प्रती टेम्पो प्रती दिन र.रू. ५८५=५०) या ठेकेदाराकडून प्रती टेम्पो प्रती दिन र.रू. ५८५=५० याप्रमाणे ३ टेम्पोसाठी एका वर्षासाठी र.रू.६,४१,१२३/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सदरचे काम हे १

वर्षे इतक्या कालावधीसाठी देणेस व त्यासाठी येणाऱ्या र.रू. ६,४१,१२३/- (अक्षरी र.रू.सहा लाख एकेचाळीस हजार एकशे तेवीस फक्त) इतक्या खर्चास व मे.श्री.जगन्नाथ महिला स्वयंरोजगार सेवा सह.संस्था यांच्याशी करारनामा करणेस व कामाचा आदेश देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४४७ विषय क्रमांक – ६

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)

सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/४/कावि/३१५/१५ दि.२०/४/२०१५

विषय - वाय.सी.एम. रुग्णालयातील हेल्थ कार्ड मॅनेजमेंट सिस्टिमचे वार्षिक देखभाल दुरुस्तीबाबत...

विषय क्रमांक ६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४४८ विषय क्रमांक – ७

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/३ई/कावि/१०/२०१५ दि.२७/४/२०१५

विषय - प्र.क्र.७ च-होली येथील सर्व्हे नं.३०१ ते १३३ मधील २४ मी. व ३० मी रूंदीचा रस्ता विकास आराखडयानुसार खडीमुरूम व बीबीएम करणेबाबत...

विषय क्रमांक ७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४४९ विषय क्रमांक – ८

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/३ई/कावि/११/२०१५ दि.२७/४/२०१५

विषय-प्र.क्र.७ च-होली येथील पठारे मळा ते कोतवालवाडी पर्यंतचा डी.पी. रस्ता विकसीत करणेबाबत...

विषय क्रमांक ८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४५० विषय क्रमांक – ९

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक –मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/३९६/२०१५ दि.२७/४/२०१५

विषय – मनपाचे विविध विभागांसाठी संगणक संच खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक ९ दफ्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४५१ विषय क्रमांक – १०

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – ई-गव्हर्नन्स

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.संपत पवार

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.ई-गव्हर्नन्स/३/कावि/४७/२०१५ दि.२८/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे 'सारथी' हेल्पलाईन प्रणाली व यंत्रणेचे वार्षिक देखभाल व दुरूस्तीकरणे तसेच Mobile App Hostingwith Windows, Blackberry & Apple iTunes इत्यादी कामकाजासाठी M/s.Tech 9 Services यांचे मार्फत करणेकामी येणाऱ्या र.रू.२,८८,९००/- (अक्षरी र.रू.दोन लाख अठ्याऐंशी हजार नऊशे) इतक्या खर्चाचे विहित नमुन्यात करारनामा करून कामकाज करुन घेणेस व सदरचा खर्च ई-गव्हर्नन्स विभागाचे "ई-गव्हर्नन्स" या लेखा शिर्षावरून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४५२ विषय क्रमांक – ११

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार, वैद्यकीय

सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे जावक क्र.मसाभां/५/कावि/२६३/२०१५ दि.२७/४/२०१५

मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मनपाच्या तालेरा व वाय.सी.एम. रुग्णालयातील त्वचारोग विभागासाठी आवश्यक लागणारी High Frequency LowTemperature Radiosurgery Machine खरेदीकामी मे.कोठारी मेडीकल अँण्ड सर्जीकल यांनी सादर केलेल्या लघुत्तम दरानुसार खरेदी करण्यास व येणा-या एकूण र.रु. ७,१४,०००/- (अक्षरी र.रू.सात लाख चौदा हजार) चे खर्चास मान्यता देणेत येत आहेत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४५३ विषय क्रमांक – १२

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – उद्यान

सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/३७१/२०१५ दि.२७/४/२०१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.१४/२०१४-१५ मधील बाब क्र.१ अन्वये मोकळी जागा क्र.५० येथील उद्यान देखभाल व संरक्षण करणेकामी श्री.साई स्वंयरोजगार सेवा सह संस्था मर्या. (निविदा रक्कम रुपये ४,८६,६२४/- (अक्षरी र.रु.चार लाख शहाऐंशी हजार सहाशे चोवीस फक्त) पेक्षा ३४.०२ % कमी) दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च रक्कम रुपये ३,२१,०७५/- प्रमाणे काम करुन घेणेस तसेच निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४५४ विषय क्रमांक – १३
दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – ई-गव्हर्नन्स
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.ई-गव्हर्नन्स/६/कावि/९८/१५ दि.२९/४/२०१५
विषय - मनपाच्या विविध कार्यालयांमध्ये इंटरनेट बँन्डविड्थचे सेवा उपलब्ध करणेबाबत...

विषय क्रमांक १३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४५५ विषय क्रमांक – १४
दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/३ई/कावि/१२/२०१५ दि.३०/४/२०१५
विषय - प्रभाग क्र.७ च-होली पिरबाबा दर्गा ते पठारेमळा पर्यंतचा डी.पी. रस्ता विकसीत करणेबाबत...

विषय क्रमांक १४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४५६ विषय क्रमांक – १५
दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – ई-गव्हर्नन्स
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.संपत पवार
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.गव्हर्नन्स/२/कावि/२७५/२०१५ दि.२९/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नागरिकांचे सोयीसाठी खाजगी तत्वावर नागरी सुविधा केंद्र सुरु केली आहेत. या केंद्रामधून शासनाचे महाऑनलाईन कडील सेवा करारनामा करुन उपलब्ध करुन देण्यास तसेच या सेवांसाठी शासन निर्णयाव्दारे निश्चित करण्यात आलेल्या शुल्काची रक्कम प्रतीसेवा रु.२०/- + (सेवाकर) नागरिकांकडून स्विकारण्यात येऊन त्याचे केंद्र चालक रु.१०.४०, महापालिका रु.२.६०, महाऑनलाईन रु.४.०० + (घेतलेला सेवाकर), राज्य सेतू समिती रु.१.००, जिल्हा सेतू समिती रु.२.०० याप्रमाणे विभाजन करणेस किंवा आवश्यक तेथे फेरनिर्णय घेऊन सर्व संबंधिताना शुल्काची रक्कम विभाजन करण्यास तसेच शासनाकडून वेळोवेळी होणा-या शासन निर्णयानुसार बदल करणेस त्याचबरोबर नागरी सुविधा केंद्रांचे कामकाजात सुसूत्रता राहण्यासाठी महापालिकेने SERVICE CENTRE AGENCY म्हणून काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४५७ विषय क्रमांक – १६
दिनांक – १२/०५/२०१५
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.शुभांगी बो-हाडे, मा.मंदा आल्हाट यांचा प्रस्ताव...

मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २२/०४/२०१५ ठराव क्र.२२ नुसार, २१ जून २०१५ रोजी जागतिक योग दिन साजरा करणेत यावा व यामध्ये खालील प्रमाणे कार्यक्रमांचा समावेश असावा. १) पिंपरी चिंचवड शहरातील महिलांसाठी योग कार्यशाळा, २) योगासन प्रात्यक्षिके, ३) योगामधील विविध विषयांवरील तज्ञांची व्याख्याने, ४) जागतिक योग स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या

महिलांचा सत्कार. वरील प्रमाणे जागतिक योग दिन साजरा करणेस व कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आवश्यक असणारा खर्च सभागृहाचे भाडे, साऊंड सिस्टिम, प्रोजेक्टर, व्याख्यात्यांचे मानधन, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, बॅनर व स्टॅन्डी पुष्पगुच्छ, मान्यवरांचा चहा नाष्टा, प्रवास खर्च इ.साठी र.रु.५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी २१ जून २०१५ हा जागतिक योग दिन नागरवस्ती विभागाच्यावतीने साजरा करणेस व त्याकामी येणा-या र.रु.५०,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४५८ विषय क्रमांक – १७

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – प्रशासन

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक –मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/८/कावि/२१६/२०१५ दि.२८/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून-

श्रीम.कलापुरे सुशीला कालिदास, लिपीक, वाचनालय विभाग यांचा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६(४) नुसार दिनांक १३/३/२०१५ चे अपिल व सदर अर्जाबाबत आयुक्तांचा दिनांक २८/४/२०१५चा अहवाल यांचे अवलोकन केले असता श्रीमती सुशिला कालीदास कलापुरे यांच्याकडून कामकाजातील झालेल्या त्रुटीमुळे नागरीकांचे कर आकारणीत झालेली तफावत करसंकलन विभागाने दुरुस्त करुन संबंधित नागरीकांकडून रकमेची वसुली केलेली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत महापालिकेचे कोणतेही नुकसान झालेले नाही. ही बाब विचारात घेता श्रीमती सुशिला कालीदास कलापुरे लिपिक यांच्यावर आयुक्तांनी लादलेली शास्ती अवास्तव आहे.

सबब श्रीमती सुशिला कालीदास कलापुरे लिपिक यांचा अर्ज स्विकारुन त्याच्या विरुद्ध आयुक्तांनी केलेली कारवाही रद्द करण्यात येत आहे. त्याऐवजी श्रीमती सुशिला कालीदास कलापुरे लिपिक यांच्या पुढील दोन वेतनवाढी भविष्यातील वेतनवाढीवर परिणाम न करता स्थगित करण्यात याव्यात तसेच त्यांचा सेवा निलंबन कालावधी हा सेवाकाळ धरण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४५९ विषय क्रमांक – १८

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय, स्थापत्य

सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.इ/स्था/कावि/५४६/२०१५ दि.२८/४/२०१५

विषय - भोसरी एम.आय.डी.सी. मधील जे ब्लॉक येथे बालनगरी विकसित करणे कामासाठी मे.पी.के.दास ॲण्ड असो. मुंबई यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार फी अदायगीबाबत...

विषय क्रमांक १८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४६०
विषय क्रमांक – १९
दिनांक – १२/०५/२०१५
विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.हिरानंद आसवाणी
अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/४/कावि/३७९/२०१५ दि.३०/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे अग्निशामक विभागास आवश्यक अग्निशामक बचाव/सुरक्षा साधने साहित्य खरेदीकामी ई-नि.सु.क्र. ३८/२०१४-१५ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.एस. एस. फलके अँड असो. पुणे यांचे एकुण बाबी ०८ साठी एकुण र.रु.९३,२३,०००/- मध्ये अग्निशामक विभागासाठी आवश्यक बचाव/सुरक्षा साधने खरेदीकामी एकुण र.रु. ९३,२३,०००/- (अक्षरी र.रू.त्र्यान्नव लाख तेवीस हजार) चे खर्चास मान्यता व त्यांचेबरोबर करारनामा करुन खरेदीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४६१
विषय क्रमांक – २०
दिनांक – १२/०५/२०१५
विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे
अनुमोदक – मा.संपत पवार

संदर्भ:- मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे जावक क्र.मसाभां/४/कावि/३४७/५ दि.२९/४/२०१५

विषय - नागरवस्ती विभागाकडील अपंग कल्याणकारी योजना क्र.३ मधील अपंगांकरीता चलन वलन साधने खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक २०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४६२
विषय क्रमांक – २१
दिनांक – १२/०५/२०१५
विभाग – ब क्षेत्रिय कार्यालय जलनिःसारण
सुचक –मा.रमा ओव्हाळ
अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बक्षे/जनि/TBdrainage/१३७/२०१५ दि.०२/०५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जलनिःसारण विभागाकडील नि.क्र.५/१०/२०१४-१५ अन्वये भाटनगर मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत वॉर्ड क्र.४२ मधील भागात जलनिःसारण व्यवस्था सुधारणा विषयक कामे करणेकामी मे.छोटेलाल चौहान (नि.र.रू.२७,८१,९४०/-) (अक्षरी र.रू.सत्तावीस लाख एक्याऐंशी हजार नऊशे चाळीस फक्त) पेक्षा ५.५० % कमी या ठेकेदाराकडून करारनामा करून घेवून ठराव क्र.८०८५ विषय क्र.२८ दि.०२/०९/२०१४ अन्वये यापुर्वी स्थायी समिती मार्फत मान्यता दिलेली आहे. सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.४७९ दि.२०/०५/२०१४ अन्वये र.रू.४०,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. सदर कामाचे आवश्यकतेनुसार सुधारित अंदाजपत्रक केलेले असुन त्याची सुधारित रक्कम रूपये ४०,००,०००/- वाढीव र.रू. १२,१८,०६०/- इतकी येत आहे. तरी ठेकेदाराकडुन मंजूर दराने सुधारीत काम करून घेणेस तसेच नियमानुसार निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४६३ विषय क्रमांक – २२
दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय
सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक –मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/१०८/१५ दि.०५/०५/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या विदयुत विभागाकडील नि.नो.क्र.३/३०-२०१४-१५ मधील अ.क्र.१५ अन्वये, भोसरी उपविभागाअंतर्गत प्र.क्र.३० मधील स्ट्रिट लाईटची सन २०१४-१५ मध्ये देखभाल व दुरुस्ती करणे व अनुषंगिक विदयुत विषयक कामे करणेकामी मे.अँम्प इलेक्ट्रीकल्स (निविदा रक्कम रु.९,२४,०३४/- (अक्षरी र.रू.नऊ लाख चोवीस हजार चौत्तीस) पेक्षा ३२.२०% कमी) या ठेकेदारास कामाचा आदेश देणेत आलेला असलेने त्यांचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४६४ विषय क्रमांक – २३
दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/१०९/२०१५ दि.५/५/२०१५
विषय - प्र.क्र.१७ मध्ये अंतर्गत पाथवे पेव्हींग ब्लॉक पध्दतीने करणेबाबत...

विषय क्रमांक २३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४६५ विषय क्रमांक – २४
दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/१०८/२०१५ दि.५/५/२०१५
विषय-प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील से.क्र.२७मधील पेव्हींग ब्लॉकची दुरुस्तीची व अनुषंगिक कामे करणेबाबत...

विषय क्रमांक २४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४६६ विषय क्रमांक – २५
दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.संपत पवार
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.YCMH/भांडार/१/कावि/८४/२०१५ दि.६/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील एक्स-रे विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रेडिएशन मॉनिटरींग डिव्हाईस वापरणेत येत असते. सदर डिव्हाईस/रेडिएशन बॅजेस (टी.एल.डी. बॅजेस) दर त्रैमासिक तपासणीकामी मे.रेनेनटेक लॅबोरेटरिज प्रा.लि. गिरगांव, मुंबई यांचेकडे पाठविले जातात. सन २०१५-१६ करिता रेडिएशन बॅजेस तपासणीकामी आवश्यक र.रु. २३,३०३/- (अक्षरी रक्कम रुपये तेवीस हजार तीनशे तीन फक्त) मे.रेनेनटेक लॅबोरेटरिज प्रा.लि. गिरगांव, मुंबई यांना आगाऊ स्वरुपात अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४६७ विषय क्रमांक – २६

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – दुरसंचार

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक –मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.दुरसंचार/१/कावि/९४/२०१५ दि.६/५/२०१५

मा.अति.आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

खाली नमूद अधिकारी यांस मोबाईल सिम सुविधा पूरविणेस, मोबाईल वापराची अधिकतम मर्यादा र.रु.३००/- (अक्षरी र.रू.तीनशे फक्त) निश्चित करणेस व मोबाईल सेवेकरिता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | अधिकारी/कर्मचारी नांव | पदनाम | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री.राजेश अंकुश आगळे | प्रशासन अधिकारी | वैद्यकीय विभाग |
| २ | श्री.पाडवी विश्र्वनीथ आपसिंग | कनिष्ठ अभियंता (वि) | ड क्षेत्रिय कार्यालय |
| ३ | श्री.पवार वैभव सिताराम | कनिष्ठ अभियंता (वि) | ई क्षेत्रिय कार्यालय |
| ४ | श्री.देवकते सागर नामदेव | कनिष्ठ अभियंता (वि) | ई क्षेत्रिय कार्यालय |
| ५ | श्री.लहारे मेहेर गंगाधर | प्रशासन अधिकारी | प्रशासन विभाग |
| ६ | डॉ.अलवी सय्यद नासिर | वैद्यकिय अधिकारी | भोसरी रुग्णालय |

तसेच श्रीमती नंदिनी अरुण सूर्यवंशी, लिपीक यांची प्रशासन आदेश क्र. प्रशा/०४/कावि/५८७/१४ दि.१२/०८/१४ अन्वये नगरविकास विभाग, नवि-२२ कडे असलेल्या मनपाविषयक कामकाजासाठी पुढील आदेश होईपर्यंत "समन्वयक" म्हणून नेमणूक करणेत आली असून त्यांची नेमणूक नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करणेत आलेली आहे. मनपाविषयक कामकाजासाठी त्यांस नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथून वारंवार मनपा अधिकारी यांचेशी संपर्क करावा लागत असलेने त्यांस "समन्वयक" म्हणून कामकाज करेपर्यंत मनपामार्फत मोबाईल सिम सुविधा अधिकतम वापर मर्यादा प्रतिमाह र.रु.३००/- निश्चित करुन पुरविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४६८ विषय क्रमांक – २७

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – नगरसचिव

सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नस/१/कावि/३७५/२०१५ दि.७/५/२०१५

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४६९ विषय क्रमांक – २८

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/३९८/२०१५ दि.७/५/२०१५

मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विविध विभागासाठी आवश्यक पॉकेट डायरी छपाईकामी को.नो.क्र.५०/२०१४-१५ अन्वये, लघुत्तम कोटेशनधारक मे.श्रीसाई श्रध्दा प्रिंटर्स, सातारा यांना सदर खरेदीकामी एकूण

र.रू.४४,०००/- (अक्षरी र.रू.चव्वेचाळीस हजार), चे  दर स्विकृत करून करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेले असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४७० विषय क्रमांक – २९

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक –मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/८/कावि/३४१/२०१५ दि.५/५/२०१५

मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे अतिक्रमण विभागासाठी हेल्मेट All Helmet ISI Mark Size- Universal Specially dosigned for Labour For demolition work Colour-DARK YELLO Meterial-Made up of Heavy duty p.e. १७५ नग खरेदी मे.श्री.सिध्दिविनायक इंडस्ट्रीज, भोसरी या कोटेशनधारकांकडील प्राप्त लघुत्तम दराने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या एकूण र.रू.५०,७५०/- (अक्षरी र.रू.पन्नास हजार सातशे पन्नास) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४७१ विषय क्रमांक – ३०

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.संपत पवार

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/४/कावि/३५६/१५ दि.६/५/२०१५

विषय - वाय.सी.एम. रुग्णालयातील एक्स रे विभागासाठी आवश्यक अत्याधुनिक डिजीटल सोनोग्राफी मशिन खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक ३०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक –११४७२ विषय क्रमांक – ३१

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – उद्यान-विद्युत

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.उद्यान/वि/१८/२०१५ दि.११/५/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपा अंतर्गत चिखली प्राधिकरण से.१८ प्लॉट क्र.२२ शिवतेजनगर उद्यान येथे लाईट व्यवस्थेकरीता म.रा.वि.वि.कं.लि. यांजकडून वीजपुरवठा घेणे आवश्यक आहे. विद्युत विभागाकडील दिनांक १/४/१५ चे मागणी पत्रानुसार वीजपुरवठा करणेकामी मा.अतिरिक्त कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.लि. आकुर्डी उपविभाग यांचेकडूल कोटेशन क्र.३५०६६८६ दिनांक २४/०४/१५ अन्वये र.रु.५४१९/- अदा करणेस कळविले आहे. सदर शुल्क म.रा.वि.वि.कं.लि. यांस अदा केलेनंतर लघुदाब वीजपुरवठा चालु होणार आहे. सदर कोटेशन शुल्क र.रु.५४१९/- (अक्षरी र.रु.पाच हजार चारशे एकोणीस फक्त) खर्च रकमेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे. सबब चिखली प्राधिकरण से.१८ प्लॉट क्र.२२ शिवतेज नगर उद्यान येथे वीजपुरवठा घेणेकरीता कोटेशन शुल्क र.रुपये ५४१९/-

(अक्षरी र.रु.पाच हजार चारशे एकोणीस फक्त) म.रा.वि.वि.कं.लि. यांस करारनामा न करता अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४७३ विषय क्रमांक – ३२

दिनांक – १२/०५/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

दापोडी निगडी हा ६१.० मी. रुंदीचा बी.आर.टी. रस्ता विकसित करण्यात आला आहे. या रस्त्यावर नागरीकांसाठी विविध सेवासुविधा पुरविण्यात येत आहेत. खालील कामांसाठी मे.व्हेक्टर डिझाइन्स यांची नेमणूक तांत्रिक सल्लागार म्हणून करण्यात यावी.

१) नाशिक फाटा उड्डाणपूल येथे पादचा-यांसाठी FOB व इतर अनुषंगिक कामे करणे.

२) दापोडी येथे मुंबई पुणे रस्त्यावर FOB बांधणे व स्थापत्यविषयक अनुषंगिक कामे करणे.

३) पिंपरी वाघेरे येथील जलतरण तलाव आच्छादित करणे.

या कामांचा मनपाचे सन २०१५/१६ चे अंदाजपत्रकात समावेश करण्यात आला आहे.

वरील कामांसाठी तसेच मनपामधील भविष्यातील विविध प्रकल्पांसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे.व्हेक्टर डिझाइन्स, १३५ ताथवडे व्हिलेज, ता.मुळशी, जि.पुणे-३३ यांचा मनपाचे तांत्रिक सल्लागार सूचीमध्ये समावेश करण्यात यावा. तसेच मे.व्हेक्टर डिझाइन्स यांना मनपाचे प्रचलित दरानुसार प्रकल्प रकमेच्या २.३५ + सेवाकर फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४७४ विषय क्रमांक – ३३

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – माहिती व जनसंपर्क

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.संपत पवार

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/५/कावि/१७/२०१५ दि.८/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने विविध पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर विकसित केल्या आहेत. शहरातील भव्य रस्ते, दुमजली उड्डाणपुल, भव्य व सुंदर उद्याने, घरकुल प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प, पाणीपुरवठा व मैलाशुद्धीकरण प्रकल्पांची यशस्वी अंमलबजावणी केली आहे. त्यामुळे महानगरपालिकेस भारत सरकारचा बेस्ट सिटी पुरस्कार मिळाला आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर महानगरपालिकेचे नावलौकिक होत आहे. तसेच देशातून व परदेशातून विविध शिष्टमंडळे शहराच्या विकासाची यशोगाथा जाणून घेण्यासाठी भेट देत असतात. अशावेळी विकास प्रकल्पांची अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे एरियल फोटोग्राफी, व्हिडीओग्राफी तसेच चित्रफित तयार करुन ती मनपास भेट देणारे मान्यवर, अभ्यांगत, विशेष अतिथी तसेच परदेशी पाहुणे यांना दाखविल्यास मनपाच्या नावलौकिकात भर पडणार आहे.

सदरची चित्रफित तातडीने तयार करणेकामी कोटेशन नोटीस क्र.१/१-२०१४/१५ प्रसिद्ध करण्यात आली होती. या कामासाठी मे.एस.बी. प्रॉडक्शन प्रा.लि., सांगवी पुणे २७ यांचे प्राप्त दरानुसार मे.निलेशा फिल्म्स पिंपरी पुणे यांना एका प्रकल्पासाठी र.रु.३२,०००/- या प्रमाणे एकूण १५ विकास प्रकल्पांची ७ ते १० मिनिटांची मराठी व इंग्रजी या दोन भाषांमध्ये चित्रफित तयार करुन देणेस मा.आयुक्त यांनी दि. २३/३/१५ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर कामासाठी अंदाजे र.रु.४,८०,०००/- इतका खर्च होईल.

मे.निलेशा फिल्म्स पिंपरी यांचेकडून कामाचा करारनामा करुन घेण्यात आला आहे. तसेच त्यांना क्र. माजसं/५/कावि/१५९/१५ दि.१०/४/२०१५ अन्वये कामाचा आदेश देण्यात आलेला आहे. सबब, महाराष्ट्र मनपा अधिनियम सुधारणा कलम ७३ (ड) नुसार केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४७५ विषय क्रमांक – ३४

दिनांक – १२/०५/२०१५ विभाग – माहिती व जनसंपर्क

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/५/कावि/१९१/२०१५ दि.८/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महानगरपालिकेच्या विविध विभागांकडील मागणीनुसार उदा. महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम, सत्कार समारंभ, अतिक्रमण कारवाई, विविध विषय समित्या सभापती निवडणुक व नेमणूक, क्रिडा स्पर्धा इ.ची व्हिडीओ शुटींग एजन्सीकडून करुन घेणेसाठी कोटेशन नोटीस क्र.१/२ २०१४-१५ प्रसिद्ध करणेत आली होती.

सदर कामासाठी मे.दर्शन डिजिटल व्हिडीओग्राफी, नवी सांगवी पुणे २७ यांचे लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. अ) एका दिवसाचे एका कार्यक्रमाचे १ तासासाठी शुटिंग करुन डाटा डीव्हीडीसह देणे र.रु.२३००/- तसेच ब) जास्तीचे रेकॉर्डींग साठी प्रती १ तास डाटा डिव्हीडीसह देणे र.रु.७००/- असे असून सदरचे दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.३३% जास्त असून स्विकृत करणेस मा.आयुक्त यांनी २७/१/२०१५ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे.दर्शन डिजिटल व्हिडीओग्राफी यांचेकडून कामाचा करारनामा करुन घेण्यात आलेला आहे. तसेच त्यांना क्र. माजसं/५/कावि/१५८/१५ दि. १०/४/२०१५ अन्वये कामाच आदेश देण्यात आलेला आहे. सबब, महाराष्ट्र मनपा अधिनियम सुधारणा कलम ७३ (ड) नुसार केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४७६ विषय क्रमांक – ३५

दिनांक – १२/०५/२०१५

सुचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:- मा.विनायक गायकवाड, मा.प्रसाद शेट्टी यांचा प्रस्ताव...

मा.उच्च न्यायालय मुंबई यांचा दि. ६ ऑगस्ट २०१३ चा आदेश तसेच मुख्य न्यायदंडाधिकारी पुणे यांनी श्री.विलास तुकाराम भोसले सेवानिवृत्त मुख्यलेखापाल यांना वरिष्ठ पोलिस निरीक्षक चिंचवड यांनी दाखल केलेल्या खटल्यातुन मुक्त केलेले (डिसचार्ज) आहे. त्यामुळे त्यांचे निलंबन योग्य व न्यायाचे होत नाही. आता त्यांच्या विरुद्ध कोणत्याही कोर्टात कोणत्याही कारणास्तव खटला दाखल अथवा प्रस्तावित नाही. त्यामुळे त्यांची स्थगित केलेली वेतनवाढ देवून निलंबित कालावधीमधील संपूर्ण वेतन व भत्ते नियमानुसार अदा करणेस तसेच Under Protest भरलेले रक्कम रु.४,२५,१५७/- त्यांना परत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४७७ विषय क्रमांक – ३६

दिनांक – १२/०५/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व जनवानी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी याप्रमाणे वर्षभर ट्रिंग ट्रिंग डे – सायकल दिवस हा उपक्रम राबविण्यात येतो. शहरातील नागरिकांचे आरोग्यमान उंचवावे तसेच प्रदुषण पातळी कमी व्हावी व नागरीकांमध्ये याबाबत जागरुकता निर्माण व्हावी हा त्यामागील हेतू आहे. तरी रविवार दि. २२ फेब्रु. २०१५ आणि रविवार दि.५ एप्रिल २०१५ या दिवशी घेण्यात आलेल्या ट्रिंग ट्रिंग डे – सायकल दिवस या कार्यक्रमासाठी नागरवस्ती विकास योजना विभागाच्या वतीने पारंपारिक लोककलाकार वाघ्या-मुरळी व गोंधळी यांचे पथक लोककला सादर करण्यासाठी नियुक्त करण्यात आले होते. या कलाकार पथकाचा एक दिवसाचा खर्च र.रु.५२५०/- याप्रमाणे २ दिवसांचा र.रु.१०५००/- इतका आलेला आहे. या कलाकारांची सदरची रक्कम अदा करणे आवश्यक आहे. तरी र.रु.१०५००/- सदरच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४७८ विषय क्रमांक – ३७

दिनांक – १२/०५/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

क क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील मौजे सांगवी प्रभाग क्र.५९ मधुबन येथिल विकास आराखड्यातील खालील रस्ते मनपाचे UTWT पद्धतीने स्टॅन्डर्ड क्रॉस सेक्शन प्रमाणे विकसीत करणेबाबत मनपा अंदाजपत्रकात आवश्यक तरतूद केलेली आहे. तरी खालील रस्त्यांकरीता सल्लागार म्हणून नेमणूक करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | डी.पी.रस्ता रुंदी | रस्त्याची लांबी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | बँक ऑफ महाराष्ट्र ते स्पायसर ब्रीज | १२.०० मी. | ७०० मी. | |
| २) | २ गणपती चौक ते अहिल्याबाई होळकर पुतळा | १२.०० मी. | ४६० मी. | |
| ३) | नरसिंह स्कूल रस्ता | ९.०० मी. | ६८० मी. | |
| ४) | जलतरण तलाव आनंदनगर रस्ता | ९.०० मी. | ६३० मी. | |
| ५) | मधुबन कॉलनी मुख्य रस्ता | १२.०० मी. | ४६० मी. | |
| ६) | मधुबन कॉलनी गल्ली १ ते ९ | ६.०० मी. | २३०० मी. | |

वरील रस्ते UTWT पद्धतीने स्टॅन्डर्ड क्रॉस सेक्शन प्रमाणे विकसीत करणेबाबत सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात वरील कामांचा समावेश केला आहे.

वरीलप्रमाणे विकास आराखड्यातील विविध रस्त्यांचे महानगरपालिकेच्या मंजुर स्टॅन्डर्ड क्रॉस सेक्शन नुसार रस्ते UTWT पद्धतीने विकसीत करण्याचे काम करण्यासाठी सल्लागार यांचेमार्फत सर्व्हे करणे, रस्त्यातील विविध सेवा वाहिन्यांचे (पाणीपुरवठा, जलनिःसारण, विद्युत, ऑप्टिकल फायबर, म.रा.वि.वि.कं., दुरसंचार इ.) स्थलांतर करुन नियोजित मागणीनुसार विकसीत करणे व स्थापत्य विषयक कामांच्या बाबींचे पुर्वगणपत्रक तयार करणे व निविदा बनविणेसह कामाची देखरेख करणे, इ.

निविदा पुर्व (Pre Tender Activity) व निविदा पश्चात (Post Tender Activity) कामे करावी लागणार आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपरोक्त संबंधित अशा विविध प्रकल्पांसाठी सल्लागार मे.पेव्हटेक कन्सल्टंट यांनी काम केले आहे. तसेच महानगरपालिकेच्या विविध रस्त्यांसाठी व बी.आर.टी. एस. रस्त्यांसाठी मे.पेव्हटेक कन्सल्टंट यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली कामे प्रगतीपथावर आहेत. या बाबींचा विचार करीता उपरोक्त विषयकामी मे.पेव्हटेक कन्सल्टंट (श्री.विकास ठक्कर) यांची सल्लागार म्हणून नेमणूक करुन मनपाच्या प्रचलित दरानुसार निविदा पुर्व (Pre Tender Activity) व निविदा पश्चात (Post Tender Activity) साठी स्विकृत निविदा किंमतीच्या (Accepted Tender Cost) ०.८०% व निविदा पश्चात (Post Tender Activity) साठी १.४५% फी अधिक सेवाकर (Service Tax) इ. मनपाच्या नियमानुसार देणेबाबत ठराव मंजुर करुन सदर कामाचे नियोजन करणेबाबत आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४७९ विषय क्रमांक – ३८

दिनांक – १२/०५/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील लोकसंख्या व त्याअनुषंगाने उपलब्ध असलेले अन्नधान्य वितरण विभागाकडील अधिकारी/कर्मचारी संस्था यांचा विचार करता पिंपरी चिंचवड शहरातील शिधापत्रिकांबाबत नविन/दुबार शिधापत्रिका देणे तसेच शिधापत्रिकांच्या अनुषंगाने इतर बदल करणेसाठी तसेच जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले, वय अधिवास राष्ट्रीयत्व दाखले व महापालिकेची नागरी सुविधा अंतर्गत अर्ज स्वीकृती करणे, इतर शासकीय कामे महा ई सेवा कंपनीचे अधिकृत केंद्रामार्फत शासनाने निश्चित केलेले शुल्क आकारुन अर्ज स्वीकारणे व पुढील कार्यवाहीसाठी पाठविणे तसेच कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर तयार शिधापत्रिका व दाखले अर्जदारास विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे इ. कामासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका इमारतीमध्ये सी.एफ.इन्फोसिस कंपनी प्रा.लि. चालवीत असलेल्या जागेत शिवशक्ती स्वयंरोजगार संस्थेस अटी व शर्तीनुसार त्यांचा पुर्वानुभव विचारात घेता त्यांना पाच वर्षे कालावधीकरीता यापूर्वीच्या अटी शर्तीनुसार मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४८० विषय क्रमांक – ३९

दिनांक – १२/०५/२०१५

सुचक – मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/६८/२०१५ दि.५/५/२०१५

मा.महापालिसा आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र. १६/२०१४-२०१५ मधील अ.क्र.१ अन्वये भोसरी येथील विद्युत दाहिनी ठेका पद्धतीने खाजगी संस्थेस चालन देखभाल दुरुस्तीकरिता देणेकामी

मे.रुपलक्ष्मी इलेक्ट्रीकल्स (नि.र.रु.३७९५०४८ (अक्षरी र.रु.सदतीस लाख पंच्यान्नव हजार अठ्ठेचाळीस) पेक्षा ५.००% कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/५५/२०१५
दिनांक - १३/०५/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.